I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 331-337
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# ब्रिटिश शासनकाळातील चंद्रपूर नगरपालिकेचे नगराध्यक्षांची कार्ये (इ.स. १८८६ ते इ.स. १९४६)

मृणाली एन. वसाके व पी. एस. माहोरे
सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
*Corresponding Author: mrunalisnimbalkar@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :-**

प्राचीन काळापासून पूर्व विदर्भामधील चंद्रपूर हे नगर महत्वपूर्ण शहर म्हणून ओळखले जाते. अगदी प्राचीन काळापासून तर मध्ययुगीन आधुनिक काळापर्यंत वेगवेगळ्या सत्ताधिशांनी आपली सत्ता याठिकाणी स्थापन केली.त्यामध्ये मध्ययुगाचा विचार केला तर गोंड, भोसले हे सत्ताधिश होते तर आधुनिक काळामध्ये ब्रिटिश हे परकिय सत्ताधारक होते. संपूर्ण भारतावर यांच राज्य होतं तसेच त्यांनी या चंद्रपूर शहरावर सुद्धा राज्य केल. इ.स. १८१८ ला मराठे शाही लयाला गेली आणि संपूर्ण महाराष्ट्रवर ब्रिटिशांची सत्ता आली. चंद्रपूर मध्ये ब्रिटिशांनी इ.स.१८५४ ला आपली सत्ता स्थापन केली आणि इ.स. १८६७ ला स्थानिक प्रशासन चालविण्याकरिता त्यांनी मुनसिपल कमिटीची स्थापना केली. परंतु इ.स. १८६७ ला राज्य करतांना प्रशासन व्यवस्था चालविण्यासाठी सुरवातीला त्यांनी स्थानिक लोकांचा सहभाग न घेता, स्वत:च इंग्रज प्रेसिडेव्ही द्वारे प्रशासन चालवू लागले. इंग्रजानी इ.स. १८६७ पासून १८८६ पर्यंत चंद्रपूर नगरपालिकेचा कारभार २५ डेप्युटी कमिशनरांच्या द्वारा केले त्यानंतर मात्र १८८६ पासून शहरातील स्थानिक प्रतिष्ठित लोकांचा, सहभाग घेण्यात आला, इंग्रज हे विकासवादि वृत्तीचे होते. म्हणून राज्यकारभार करतांना त्यांना शहराचा विकास करायचा होता त्याकरीता त्यांनी स्थानिक लोकांचा सहभाग करून घेतला आणि विकास कामाला सूरवात केली, सुरवातीला निवडणूक न घेता शहरातील प्रतिष्ठित व्यक्तीचा सहभाग घेण्यात आला. स्थानिक लोकांचा सहभागामुळे विकास कामाला गती आली. कारण आता इंग्रज प्रेसिडेव्ही बरोबरच स्थानिक प्रतिनिधी सुद्धा शहर विकास कामात सहभागी होऊ लागले. जनतेच्या समस्या, प्रश्न, गरजा समजून घेणे आणि त्यांना विविध माध्यमातून वेगवेगळ्या सोयी-सुविधा पुरवून जनतेचे हित जोपासणे, कल्याण करणे आणि शहराचा विकास करणे हे प्रशासनाचे मुख्य कर्तव्य बनले होते आणि त्यानुसार कार्य करून त्यांनी आपली वाटचाल केली होती.

**बीजसंज्ञा :-** चंद्रपूर शहर, निवडणूक इंग्रज सरकार.

## प्रस्तावना :-

प्राचीन वारसा लाभलेल्या या चंद्रपूर नगरीवर अनेक राज्यकर्त्यांनी आपली सत्ता गाजविली, गोंड, भोसले आणि ब्रिटिश त्यापैकी महत्त्वपूर्ण सत्ता म्हणजे ब्रिटिशांचीच होय. ब्रिटिश येण्यापूर्वी जरी इतर शासक राज्यकर्ते होते पण शहराचा खरा विकास झाला तो या ब्रिटिश शासन काळात, पूर्वी हा समाज सनातन धार्मिक, अध्यात्मीक, भ्रामक कल्पनांनी गुरफटलेला होता परंतू ब्रिटिशांचे आगमन भारतात झाले त्यांनी इथला कानाकोपरा व्यापला आणि शासन करण्यास सुरवात केले आणि भारतीय समाजाला एका नव्या युगाची ओळख झाली, ब्रिटिशांचे शासन म्हणजे एक प्रकारे पोलादी शासन होते असे म्हणायला हरकत नाही, ब्रिटिशांमुळे अंधश्रद्धा जुन्या चालिरिती परंपरा यामध्ये गुरफटलेला समाज जागा व्हायला सुरवात झाली आणि समाजामध्ये सुधारणेचे वारे वाहू लागले, ब्रिटिशंनी इंग्रजी शिक्षणाचा प्रसार भारतीय समाजामध्ये वेळ्या हेतूसाठी सुधारक समाज उदयास आला.

त्यांनी समाजाला सुधारणेचे दिशेने वाटचाल करायला लावली होती.

ब्रिटिश राज्यकर्ते जसे स्वार्थी होते तसेच ते दूरदर्शी व धोरण होते 'कान सदन बांधावे की पुढे बिळे करील म्हणून घूस!' या तत्वाचा अंगिकार करून ते जेथल्या तिथे स्थिर न राहता, इथे आल्यावर त्यांनी सार्वजनिक लोककल्याणकारी योजनांस त्यांनी प्रारंभ केला. सर्वप्रथम त्यांनी सार्वजनिक शिक्षणाची, आरोग्याची, रस्त्यांची, टपालाची, रेल्वेची, ग्राम, नगर, जिल्हा, प्रांत देश यांच्या राज्यकारभाराची, न्यायलायची आणि संरक्षणाची कामे हाती घेतली होती, चन्द्रपूरावर प्रशानस व्यवस्था त्यांनी सुरवात कल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की, या चंद्रपूर नगरीचा पाहिजे तसा विकास झालेला नाही त्या अनुषंगाने त्यांनी आपल्या वैधानिक कार्यक्रमास सुरवात केली. न भोसल्यांचे राज्य त्यांनी १८५४ मध्येच खालसा केले त्यानंतर त्यांनी मुन्सिपल कमिटीची इ.स. १८६७ ला मुहूर्तमेढ रोवल्या गेली पुढे इ.स. १८८६ पर्यंत ती इंग्रजी कलेक्टरांच्या माध्यमातून प्रशासन चालविण्यात येत होता.

इ.स. १८८६ मध्ये ती मुलकी म्हणजेच स्थानिक लाकांच्या हातात सोपविण्यात आली, यालाच इंग्रजाच्या उदार, दूरदृष्टी मार्गदर्शनाचा पहिला टप्पा म्हणता येईल, इंग्रजांनी इ.स. १८६७ पासून १८८६ पर्यंत चांदा येथे २५ डेप्युटी कमिश्नर, द्वारे कारभार चालविला परंतू इ.स. १८८६ ला २६ वे स्थानिक मुलकी नगराध्यक्ष म्हणून चंद्रपूर शहराती पहिले नगराध्यक्ष बनले त्यानंतर ब्रिटिशांची कारकिर्द संपुष्टात येईपर्यंत सर्व नगराध्यक्ष ही स्थानिक पातळीवर निवडून येत होती. सुरवातीला रससकट प्रतिष्ठित लोकांची नेमणुक करण्यात येत होती नंतर निवडणूकीच्या माध्यमातून प्रत्यक्ष निवडणूक घेऊन नगराध्यक्ष व त्याच्या इरत सदस्यांची निवड करण्यात येत होती.

**१. रावसाहेब चंदिप्रसाद दीक्षित :–**

चंद्रपूर नगरीचे पहिले नगराध्यक्ष होण्याचा मान मिळाला तो शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती म्हणजे रा.सा. चंदीप्रसाद दीक्षित यांना, चंदीप्रसार दिक्षीत हे पहिल्या नागरीकाच्या म्हणजेच नगराध्यक्ष पदावर आरूढझाले. ते दिक्षित घराण्याचे कर्तबगार आद्यपुरूष होते ते अतिशय सुखसंपन्न व वैभवशाली घरातून आले असले तरी त्यांना सामान्य लोकांचा कळवळा असल्यामुळे अधिक लक्ष देत होते.

या काळात त्यांची नेमणुक ही इंग्रज सरकारकडून झाली आणि त्यांना 'रावसाहेब' ही पदवी सरकारने देऊन त्यांचा सन्मानपूर्वक गौरव केला. त्याकाळात नगराध्यक्ष प्रमाणे नगरपित्यांची नेमणुक सुद्धा सरकारच करे, रावसाहेब यांच्या बुद्धीमत्तेला आणि कर्तबदारीला सरकार दरबारी मान होता.

**२.इ.स. १८९४ ते १९०६ च्या निवडणूकी :–**

इ.स. १८९४ मध्ये पुन: चंद्रपूर नगरपालिकेची इ.स. १८८६ च्या पद्धतीनेच निवडणूक घेण्यात आली आणि यापण वेळेस पुन: एकदा रा.सा. चंदीप्रसाद दिक्षित नगरोपध्यक्षपदि श्री. गोपाळराव डोंगरे व सेक्रेटपदी श्री.जी.एम. डोंगरे व रामभाऊ डोंगरे हे पदाधिकारी निवडून आले. या सर्वांच्या दैनदिनी कामकाजावर निक्षून ठेवण्यासाठी सेक्रेटरी पदाची निर्मीती करण्यात आली आणि तो त्याच्यावर लक्ष ठेवत असे.

इ.स. १८९६ मध्ये परत दुसरी निवडणूक घेण्यात आली परत ऐदा रावसाहेब दिक्षित हे निवडून आले त्यांच्या मदतीला उपाध्यक्ष म्हणून श्री केशवराव हेडमास्तर व सेक्रेटरीचे जागेवर श्री. आर. आर. बोबडे निवडून आले.

**कार्ये :–**

१८९६ मध्ये दुष्काळ पडला होता, त्या दुष्काळात लोकांना काम मिळावे म्हणून बाजार दरूस्ती करण्यात आल्या.त्याचप्रमाणे शहरातील सडका दुरूस्ती, नविन सडकांची निर्मिती करण्यात आली.तसेच घुटकाळा तलावाची कामे काढून गोर–गरीबांना कामास लावण्याची व्यवस्था करण्यात आली. ३१ मार्च १८९९ ला आर्थिक वर्ष पूर्ण झाले. तीन वर्षाची निडणूक कारकिर्दही संपली परत एकदा नगराध्यक्ष म्हणून दिक्षित आहे व बाकीची त्यांची कार्यकारीणी गठित करण्यात आली यामध्ये इ.एस.सी. श्री. एम् हुसेन व श्री. आर. आर. बोबडे निवडून आले.

**कार्ये :–**

इ.स. १८९९ मध्येदुष्काळाने कहर केला. तेव्हा गरीब जनतेला मदतीसाठी म्हणून घुटकाळा तलाव, रामाळा तलाव व लेंढरा तलावांच्या दुरूस्तीचे काम करण्यात आले.

तसेच सकडकांवर माती घालण्याची व विहिरी उपसण्याची कामे नगराध्यक्षाच्या वतीने लोकांना देण्यात आली.तसेच रावसाहेब यांच्या कारकिर्दीतील महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे, पूर्वी सरकारी दवाखान्याच्या जागेवर भंगी कॉलनी होती. ती त्यांनी तेथून हटवून त्या जागेवर शहराच्या मध्यभागी सरकारी दवाखाना बांधण्यास जागा करून दिली व कॉलनी हल्लीच्या ठिकाणी वसविली. पुढे इ.स. १९०२ ते १९०४ करीता पुन: जुनेच पदाधिकारी निवडून आले. आणि आता सेक्रेटरी पद हे सरकारी बनून सरकार त्याला पगार देत असे. पुढे इ.स. १९०५ पासून १९०८ करीता निवडणूक घेण्यात आले यावेळेस पुन्हा रावसाहेब दिक्षित हेच नगराध्यक्ष बनले पण यावेळेस मात्र इ.स. १९०६ ला अकल्पितपणे त्यांना देवआज्ञा झाली व ते इहलोक सोडून गेले. अशा प्रकारे त्यांच्या एकतंत्री कारकिर्दीचा अंत झाला.

**२.श्री दाजी देवईकर :–**

२० वर्षाच्या चंदीप्रसाद दिक्षितच्या कारकिर्दीनंतर १९०६ पासून ७ डिसेंबर १९०७ पर्यंत अत्यल्प काळ दादासाहेबांचा होता कारण त्यावेळेस लोकमान्य टिळकांच्या असंतोषाच्या ज्वाळा धगधगत होत्या परिणाम देवईकरांवर होऊन ते ह्या झोतांनी राष्ट्राभिमान जागृतझाल्यामुळे राष्ट्रीय चळवळीकडे खेचल्या गेले व त्यांची कारकिर्द ही संपुष्टात आली.

**३. श्री. जे. ही. मार्टिन :–**

इ.स. २०–२२ वर्षाच्या कारकिर्दीनंतर इंग्रज अधिकाराच्या हाती सत्ता गेली. आणि श्री. जे. टी मार्टिन हे नगराध्यक्ष पदावर आरूढझाले. पण इ.स. १९०९ सप्टेंबर मध्ये त्यांची बदली झाल्याने पुन्हा नगराध्यक्षाचे पद खाली झाले.

**४. श्री जी.एन. खान :–**

४ ऑक्टोंबर १९०९ पासून १४ ऑगस्ट १९११ पर्यंत जी.एस.खान नगराध्यक्ष पदावर कार्यरत होते, त्यांनी या काळात अनेक विकास कामे केली.

**कार्ये :–**

ज्या भुमीवर नगरपालिकेची भव्य इमारत उभी आहे त्या जागेवर सरकारी व्हिक्टोरीया मेमोरियल हॉस्पीटलची सरईवजा इमारत होती ती म्युनिसिपल कमिटी व डिस्ट्रिक्ट कौन्सीलचे ऑफीसकरीता घेण्यात आली.गोल बाजार व्यवस्था, टांगा लैसन्स नियम, सराई बांधण्याची योजना म्युनिसिपल निवडणूकीचे व कमिटीवचे कामकाज चालविण्याचे नियम तयार करण्यात आले.नगरपालिकेच्या हेडक्लर्कचे जागी रू ४० पगारावर नेमणूक तसेच १९११ च्या दिल्लीदरबाराकरीता १००० रू व सॅनिटरी इन्सपेक्टर व नझुल इन्स्पेक्टर म्हणून नव्या जागा निर्माण केल्या.

**५.रावबहादूर रामभाऊ मेघशाम :–**

रामभाऊ मेघशाम हे नवे नगराध्यक्ष बनले. परंतु २६ जानेवारी १९०२ पासून रा.ब. रामभाऊ घनश्याम सुट्टीवर गेल्यामुळे त्यांच्या जागी श्री. बैमनजी मंचरजी हे पारशी गृहस्थ इ.स. १९१४ पर्यंत नगराध्यक्ष पदावर पदसिद्ध होते.

**६.ॲड माधव सांबशिव चेंडके :–**

इ.स. १९१४ सालचा पूर्वाध म्हणजे पहिल्या महायुद्धाचा पूर्वीचे दिवस २४ एप्रिल १९१४ श्री माधव चेंडके यांची चांदा नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. १९१७ पर्यंत ते या पदावर कार्यरत राहणार होते.

त्यानंतर इ.स. १९१६ ते १९१९ करीता परत निवडणूक घेण्यात आल्या त्यावेळेस ३१ मार्च १९१९ करीता परत एकदा ॲड माधव चेंडके यांची नगराध्यक्ष पदावर निवडणूक करण्यात आली. १९१९ पासून १९२२ पर्यंत परत पदावर चेंडके आणि त्यांची कार्यकारीणी होती.

**कार्ये :–**

श्री माधवराव सांबशिव चेंडके यांची कारकिर्द सतत १९१४ पासून १९२२ पर्यंत होती १९१४, १९१६, १९१९ मध्ये ते

नगराध्यक्ष म्हणून निवडून आले.नगराच्या साफसफाईचे व्यवस्था भंग्याकडे देण्यात आली. हाच सफाईचे कामाचा श्रीगणेशा होय. याच कारकिर्दीपासून साफसफाईकडे विशेष लक्ष घालण्यात आले. आजपर्यंत संध्याकाळची दिवाबत्तीची नगरात काहीच व्यवस्था नव्हती, मुख्य चौकांवर लाकडी खांब उभारण्यात येऊन खांबाच्या टोकाला चौकटी बसविण्यात येऊन त्यात मोठ्या कांदीलाची रात्रभर प्रकाश येण्याची व्यवस्था उभारण्यात आली.१९१८ मध्ये लोकमान्य टिळक चंद्रपूरच्यश दौऱ्यावर आले होते. (होमरूल लीग चळवळ) त्यांचे गोल बाजार मैदानावर भव्य स्वागत व सत्कार करण्यात आला त्याला पुढे टिळक मैदान म्हणण्यात येऊ लागले.

**७. श्री. गणपतप्रसाद त्रिवेदी :–**

चांदा म्युनिस्पिल कमिटीची स्थापना १८६७ मध्ये असली तरी निवडणूकीचे स्वरूप हे डेप्युटी कमीश्नरच्या सल्ल्याने नेमणुका आणि नॉमिनेटेड प्रतिनिधीच्या सहायाने कारभार केला जाई. मतदान करून खऱ्या अर्थाने पहिल्यांदाच नगरातील सर्व स्तरातील निवडणूकीत भाग घेऊन प्रतिनीधी म्हणून कारभार पाहण्याची संधी मिळाली होती. त्यामध्ये ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर वादही समाजामध्ये उफाळून आला होता. पण याचबरोबर काही कामे पण करण्यात आली.

**कार्ये :–**

बुक्केकरांचा बुक्का तयार करण्याकरीता व विणकरांना कापड विणण्याच्या व्यवसायाकरीता अर्थसहाय्य देण्यात आले. नगरपालिका हद्दीत गायीवासरांच्या कत्तलीस संपूर्णत: बंदि घालण्यात आली. याप्रमाणे नगराची साफससफाई, दिवाबत्ती, बाजार-व्यवस्था, शिक्षण, आरोग्य या सर्वांकडे लक्ष देऊन विविध सोयी सुविधा पुरविल्या गेल्या.

**८.श्री विश्वनाथ शालिग्रामदीक्षित :–**

३१ मार्च १९२५ ला मागील कारकिर्द संपून नविन निवडणूका झाल्या यामध्ये ब्तवापहिल हे निवडून आले हे निष्ठावान कॉग्रेसवादि होते. ते खादी पोशाख वापरत ते नेहमी जनतेच्या हितासाठी खपत होते. त्यांनी सार्वजनिक कार्याकडे जातीने लक्ष दिले. त्यांच्या कारकिर्दीतस राष्ट्रपिता म. गांधीनी १४ नोव्हेंबर १९३३ ला चंद्रपूर नगरास भेट दिली, त्या स्मृतीप्रित्यर्थ नगरपालिकेचे गांधीभवन उभे केले. तसेच नगरपालिकेची धर्मशाळा उभी करण्याचे काम हाती घेण्यात आले. त्यासाठी वेगवेळ्या स्तरावरून निधी गोळा करण्यात आला.

**९.शेठ करमल्ली हसनभाई :–**

मार्च १९२८ मध्ये त्रैवार्षिक निवडणूक पुन्हा घेण्यात आली व हसनभाई निवडून आले त्यानंतर लगेचच १ वर्षांनी हसनभाई पैंगबरवासी झाले आणि खुशालचंदची खजानची यांची नगराध्यक्षपदि निवडणूक झाली. त्यानंतर मार्च १९३१ मध्ये परत

निवडणूका झाल्यावर खुशालचंद निवडूण आले. १९२९ ते १९३२ पर्यंत देशात अनेक राष्ट्रीय आंदोलने उभी राहिली त्यामध्ये या चंद्रपूर नगरीचा सुद्धा सहभाग होता. झेंडादिन, गांधीदिन, गढवालदिन, महिलादन, पिकेहित दिन, बहिष्कार दिन यासारखे आंदोलन राबविण्यात आले.

**कार्ये :-**

प्राथमिक शाळांतून अस्पृश्यता निवारण. सक्तीचे प्राथमिक शिक्षण.याबरोबरच चंद्रपूर नगराला अपूर्व देणगी म्हणजे विजेचे दिवे दिवाबत्तीबरीता देण्यात आली.

**१०. शेठ नुरमहंमदत कासम/नुराभाई :-**

इ.स. १९३४ च्या सुमारास परत एकदा निवडणूका झाल्या त्यामध्ये शेठ नुराभाई हे नगराध्यक्ष बनले त्यांनी आपल्या हयातील अनेक कार्ये केले.

**कार्ये :-**

ऑक्ट्राय, शिक्षण, आरोग्य, रस्ते, बाग आदि सुधारणांवर भर देण्यात आला. तसेच छात्राखाली भाजी बाजार उभारण्यात आला. भाजीमंडईवर त्यांची छाप बसली.

**११. डॉ. लक्ष्मणकृष्ण रंगारी :-**

शेठ नुराभाई यांची कारकिर्द झाल्यानंतर इ. स. १९३७ मध्ये निवडणूकीत डॉ. रंगारी निवडून आले व नगराध्यक्ष बनले, यांच्या कारकिर्दीमध्ये नगरपालिकेमध्ये खुपच अंधाधुंद कारभार सुरू झाला.

चंद्रपूर शहराचा विकास होण्याऐवजी यांच्या काळात शहराची अनेक प्रकारे दूर्दशा झालेली दिसून येते.

**१२ शेठ राजमलजी पुगलिया :-**

डॉ. रंगारी यांच्या अंदाधूंद कारभार कारकिर्दीनंतर ११ ऑक्टोबर १९४१ रोजी झालेल्या निवडणूकीमध्ये शेठ राजमलजी पुगलिया निवडून आले व त्यांनी नगराध्यक्षाची खुर्ची सांभाळली आणि त्यावेळेस हे ५ वर्षाकरीता नगराध्यक्ष बनले. इ.स. १९४१-४२ चा काळ हा अशान्ततेचा काळ होता याकालावधीत पाहिजे तेवढी विकासकामे झाली नाही.

सगळ्यांचे लक्ष हे राष्ट्रीय आंदोलनाकडे लागले होते. शेठ राजमलजी पुगलिया यांच्या कारकिर्दीत फक्त महत्त्वपूर्ण म्हणजे गांधी भवनाचा पाया रचण्यात आला.

**मूल्यमापन :-**

ब्रिटिशांनी आपले हातपाय भारतभर पसरले त्याचप्रमाणे या चंद्रपूर नगरीवर सुद्धा त्यांनी आपली सत्ता गाजविली, ब्रिटिश राजकर्ते हे विकासवादी असल्यामुळे त्यांनी शासनकाळात विकासकामेही केली आणि ती करतांना त्यांनी स्थानिक पातळीवरील लोकांचाही सहभाग घेतला त्यामाध्यमातून निवडूण आले आणि त्यांनी आपापल्या कारकिर्दीत शहरासाठी अनेक विकास कामे करून शहराची प्रगती व जनतेचे कल्याणकारी कामे त्यांनी केली.

१. ब्रिटिश राजवटिमध्ये इ.स. १८८६ पासून ते १९४७ पर्यंत विविध नगराध्यक्षांनी प्रशासनात सहभागी होऊन कारभार केल्याचे दिसून येते.

**संदर्भ :-**

**प्राथमिक साधने :-**

नियोजन विकास प्रोसेडिंग रजिस्टर (१८८६-९९)

ठराव क्रमांक १४/२० मार्च १८९९

नियाजन विकास प्रासेडिंग बुक (१९०६-१९०८)

१) ठराव क्रमांक २/१२ फेब्रुवारी १९०६

२) न.प. ठराव क्र. १५/६ जानेवारी १९०८

नियोजन विकास प्रोसेडिंग बूक (१९११ ते १९१४)

ठराव क्र. १/१४ ऑगस्ट १९११

नोटीफीकेशन नं. १०३९ जी ३/३० एप्रिल १९०९ अन्वये ३१ मार्च १९२२ करीता.

नियोजन विकास प्रोसिंडिक बुक (इ.स. १९२९-३४)

नियोजन विकास प्रासिंडिंग बुक (१९३५-१९४१)

**दुय्यम साधने :-**

काटकर तु.ना., चंद्रपूर नगरपालिका शताब्दी ग्रंथ

कोठेकर डॉ. शांता, नागपुर त्रिशताब्दी, नागपूर त्रिशताब्दी महोत्सव उपसमीती

पोतनवार किशोर विदर्भालंकार, विलक्षण सत्य प्रकाशन चंद्रपूर २०१०

श्री राजुरकर अ.ज., चंद्रपूरचा इतिहास